# <u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.</u>

## <u>स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणुकीची विशेष सभा 2017</u>

शनिवार, दि. 30.12.2017 रोजी सकाळी 10.00 वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदावर निवड करण्यासाठी **स्थायी समितीची विशेष सभा, अरुण डोंगरे, पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी, नांदेड यांचे अध्यक्षतेखाली नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहामध्ये भरविण्यात आली होती.**

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन खालील स्थायी समितीचे सदस्य उपस्थित होते .

<u>सर्व श्री / श्रीमती.</u>

| | |
|---|---|
| देशमुख सतिश पुंडलीकराव | पवळे उमेश देवराव |
| चव्हाण आनंद शंकरराव | खान फारुख अली इलीयाज खाँ |
| येवनकर मोहीनी विजय | तिडके प्रशांत विठ्ठल |
| स. शेर अली अ. महेबुब अली | खान म.मसुद अहेमद खान उस्मान खान |
| अ. सत्तार अ. गफुर | अब्दुल शमीम अब्दुल्ला साब |
| अ. लतीफ अ. मजीद | रावत भानुसिंह गयादिनसिंह |
| मुथा कांताबाई प्रकाशचंद | नवाब गुरमितसिंघ ब-यामसिंघ |
| गोडबोले ज्योत्सना राजु | |

**खालील स्थायी समितीचे सदस्य अनुपस्थितीत होते.**

वैशाली मिलिंद देशमुख

**विषय क्रं. 1 :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 21(1) व शासन अधिसुचना क्र .बिएनएम-5007/ प्रक्र.15/नवि-32 दिनांक 17 फेब्रुवारी 2007 व शासन अधिसुचना क्रमांक बिएनएम/2008/295/प्रक.106/ 2008/नवि-32 दिनांक 12 डिसेंबर 2008 मधील नियम 4 (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समित्या आणि इतर समित्याचे सभापती यांची निवडणुक घेणे मधील तरतुदीनुसार स्थायी समितीच्या निर्वाचीत (16) सदस्यां मधून स्थायी समितीच्या सभापतीची निवड करणे बाबत.

**नगरसचिव** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 21(1) आणि स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे (नियम, 2007 चे नियम 2(2) चे सुधारीत तरतुदी प्रमाणे मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेशी विचार विनिमय केल्यानंतर स्थायी समितीचे सभापती पदाची निवडणूक घेण्याकरीता या समितीची विशेष सभा घेण्यासाठी दिनांक 30.12.2017 ही तारीख निश्चित करण्यात आली. स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे सुधारीत नियम, 2008 चे नियम 4 अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मा. विभागीय आयुक्त यांनी आजच्या स्थायी समितीच्या विशेष सभेसाठी **क्रं. जा.क्रं. 2017/नपाप्र/ निवडणुक/कावि-175, दिनांक 21.12.2017** त्यांचे प्रतिनिधी म्हणून मा. श्री अरुण डोंगरे, जिल्हाधिकारी, नांदेड यांना पिठासिन अधिकारी म्हणून प्राधिकृत केलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 21(1) आणि महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम 2007 मधील तरतूदीनूसार स्थायी समितीच्या सभापती पदासाठी निवड करण्याकरीता दि. 26.12.2017 रोजी निवडणूक कार्यक्रमासह सभेची नोटीस निर्गमित करण्यात आली होती. त्यानुसार दि. 28.12.2017 रोजी नामनिर्देशनपत्र वाटप करणे व स्विकारण्याची कार्यवाही पूर्ण झाली असून निर्दिष्ट कालावधीत म्हणजे दिनांक 29.12.2017 रोजी दुपारी 3.00 वाजे पर्यंत स्थायी समितीच्या सभापती पदासाठी **श्री अब्दुल शमीम अब्दुल्ला साब या एकाच उमेदवारांचे 02 नामनिर्देशनपत्र** प्राप्त झालेले असुन **श्री अब्दुल शमीम अब्दुल्ला साब यांचे** एका नामनिर्देशनपत्रावर सुचक म्हणुन श्री आनंद शंकरराव चव्हाण अनुमोदक म्हणुन श्री उमेश देवराव पवळे तर दुस-या नामनिर्देशपत्रावर सुचक म्हणुन श्री सतीश पुंडलीकराव देशमुख अनुमोदक म्हणुन नवाब गुरमितसिंघ ब-यामसिंघ हे आहेत.

श्री अब्दुल शमीम अब्दुल्ला साब यांचे सभापती स्थायी समिती पदासाठी सादर केलेले दोन्ही नामनिर्देशनपत्र छाननीसाठी मा. प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत आहेत.

**पिठासीन अधिकारी** स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे नियम, 2007 चे नियम क्र. 5 अन्वये नामनिर्देशनपत्राची छाननी करण्यात येत आहे.

या एकाच उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रावर सुचक, अनुमोदक व उमेदवारांच्या स्वाक्षरीत असल्यामूळे **श्री अब्दुल शमीम अब्दुल्ला साब** या एकाच उमेदवारांचे दोन नामनिर्देशनपत्रे वैध ठरली आहे, घोषित करण्यात आलेल्या निवडणूक कार्यक्रमानूसार वैधरित्या नामनिर्दिष्ट उमेदवारास आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल तर त्यांना उमेदवारी परत घेण्यासाठी 15 मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे. म्हणजेच सकाळी 10.06 ते 10.22 वाजे पर्यत आपली उमेदवारी परत घेता येईल.

**पिठासीन अधिकारी** विहित कालावधीत उमेदवारी परत घेतलेली नसल्यामूळे स्थायी समिती सभापती पदासाठी श्री अब्दुल शमीम अब्दुल्ला साब यांच्या व्यतिरिक्त दुसरा कोणत्याही उमेदवारांचा नामनिर्देशनपत्र सादर केला नसल्याने **श्री अब्दुल शमीम अब्दुल्ला साब** हे स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे नियम 2007 मधील नियम (7) नुसार त्यांची स्थायी समिती सभापती पदावर बिन विरोध निवड झाल्याचे मी अरुण डोंगरे पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी नांदेड घोषीत करतो व आजच्या सभेचे कामकाज संपल्यामुळे आजची सभा संपल्याचे जाहिर करतो.

**स्वाक्षरीत/-**
**( अरुण डोंगरे )**
**पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी, नांदेड**
स्थायी समिती सभापती निवडणूक 2017
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड